FORM-1A N.C.R.B.

I.I.F.-I

पहिली खबर

0154210

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे लाप्रवि, पहिली खबर क्र. 02, वर्ष 2022 दिनांक 12/01/2022
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 कलमे Sections 7
(ii) अधिनियम Act —, कलमे Sections —
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections —

3. (a) अपराधाची घटना : वार मंगळवार तारीख पासून 11/01/22 वेळ ......, तारीख पर्यंत 12/01/22 वेळ 16:00
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख 11/01/22, वेळ 14:00
Information received at P. S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. 38/22, तारीख 12/01/22 वेळ 23:45
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : प्रत्यक्ष, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ......, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ......
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव आझाद मैदान, ठिकाणाचे नंबर वाहतूक, गल्ली विभाग रस्त्याचे नाव मुंबई यांचे कार्यालय
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ......, गाव ......, पोस्ट ......, तालुका ......, जिल्हा ......, राज्य ......
Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव —, तालुका ......, जिल्हा ......, राज्य ......
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव हरिश रामबहाल सिंह (b) वडिलांचे / पतीचे नाव रामबहाल सिंह
Name Father's / Husband's Name
(c) जन्म तारीख व वय 51 वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. 9920645564
Date of Birth and Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ......, दिल्याचा दिनांक ......, दिल्याचे ठिकाण ......, (f) व्यवसाय ट्रॅव्हल्स व्यवसाय
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion हिंदू, जात Caste ......, जनजात Sub-Caste ......
(h) पत्ता 2/40 गल्ली / सर्व्हे नं. कामगार घर / नाव नं. को हौ फोन / मो. नं. पोपावटी पॅन नं. ......, वोटर्स नं. ......
Address : Ward House/Name No. Phone/Mo. No. PAN No. Card No.
रस्त्याचे नाव बि.नं. 2, जवळचे प्रसिद्ध ठिकाण एस. के. बोले रोड, पोस्ट दादर (प) पो. स्टे. मुंबई 28
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ......, जिल्हा ......, राज्य ......, सध्याचा पत्ता ......
Taluka Dist. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

① शितल महादेव मालटे वय 39 वर्षे, पोलीस निरीक्षक, आझाद मैदान वाहतूक विभाग, मुंबई.
② तुषार किसन चव्हाण वय 35 वर्षे, पोलीस शिपाई क 093187, आझाद मैदान - वाहतूक विभाग, मुंबई

Y.P.P.-800 Reg.-(25×6=150 Lvs.)-2-2018-PA3-(K) 829

यातील फिर्यादी श्री हरिश रामबहाल सिंह वय 51 वर्षे धंदा - ट्रॅव्हल्सचा व्यवसाय, रा. हि 2/40, कामना हौ सोसायटी बि. नं 2, एस के बोले रोड, दादर (प) मुंबई 28 यांचा स्वतंत्र पानावर जबाब नोंद करण्यात आला असून त्यास नमुद गुन्ह्याची प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(प्रदीप देवकर)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई

जबाब दि. १२/०१/२०२२

श्री.हरीश राम बहाल सिंह, वय ५१ धंदा– व्यवसाय (टुर्स अॅन्ड ट्रॅव्हल्स), पत्ता – २/४०, कामना को.ऑ.हौ.सोसायटी बिल्डींग नं.२, एस के बोले रोड, दादर पश्चिम, मुंबई ४०० ०२८, मोबाईल क्र. ९९२०६४५५६४, आधार कार्ड क्र.६७२०३७९७४१५५.

-----•-----

मी वरीलप्रमाणे असून उपरोक्त नमुद पत्त्यावर जन्मापासुन रहावयास आहे. माझा टुर्स अॅन्ड ट्रॅव्हल्सचा व्यवसाय असुन त्यातुन मिळणारे उत्पन्नावर माझा उदरनिर्वाह करीत आहे.

माझा दादर मध्ये सिध्दिविनायक टुर्स अॅन्ड ट्रॅव्हल्सचा व्यवसाय आहे. माझे मालकीच्या टाटा कपंनीचे दोन बसेस क्र. एम.एच.०१ सीव्ही ६६८७ व एम.एच.०१ सीव्ही ४५५१ आहेत. माझे दोन बसमधुन एमएमआरडीए चे कामगार चेंबूर ते कफ परेड पर्यंत पोहचविण्याचे काम दररोज करीत असतात. मागील दोन हफ्त्यांपासून माझे उपरोक्त नमुद दोन्ही वाहनांवर आझाद मैदान वाहतुक विभाग येथील पोलीस अंमलदार तुषार चव्हाण (नाना), धनराज कलाने, व कुलाबा वाहतुक विभागाच्या मुबारक शेख मॅडम यांनी मिळुन रू. १,५००/– प्रमाणे वारंवार वाहतुक विभागामार्फत दंडाची चलन कारवाई करण्यात येत होती. त्या अनुषंगाने मी दि. १०/०१/२०२२ रोजी आझाद मैदान वाहतुक विभागाचे पोलीस अंमलदार चव्हाण व धनराज कलाने यांना भेटलो असता त्यांनी सदरबाबत शितल मालटे मॅडम, प्रभारी पोलीस निरीक्षक, आझाद मैदान वाहतुक विभाग, मुंबई यांना भेटण्यास सांगितले.

मी शितल मालटे मॅडम, प्रभारी पोलीस निरीक्षक, यांच्या आझाद मैदान वाहतुक विभाग येथील कॅबीनमध्ये जावुन त्यांना भेटलो असता मॅडमनी मला एका गाडीचे त्यांच्या हद्दीमध्ये पार्कीगकरीता रू. २,०००/– प्रमाणे दोन गाडयांचे एकुण रू.४,०००/– दरमहा दयावे लागतील असे सांगितले. त्यानंतर वाहतुक विभागामार्फत ७ दिवसांमध्ये रू. ११,०००/– रक्कमेचा दंड आकारण्यात आल्याने मी मॅडमना थोडी रक्कम कमी करण्यास सांगितले. त्यावेळी मालटे मॅडम यांनी मला मागील दोन महिन्यांचे दरमहा रू. ४,०००/– प्रमाणे व येथुन पुढे दर महिन्याचे दोन गाडयांचे एकुण रू.३,०००/– प्रमाणे माझेकडे लाचेची मागणी केली व सदरची रक्कम पोलीस अंमलदार तुषार चव्हाण (नाना) यांच्याकडे देण्यास सांगितले. तसेच कुलाबा, कफपरेड, व्हि.टी पर्यंत माझे उपरोक्त नमुद दोन बसेसला कोणतीही पार्कीगकरीता अडचण येणार नाही तसेच कुलाबा वाहतुक विभागाच्या मुबारक शेख मॅडम देखील माझे दोन्ही बसेसवर कारवाई करणार नसल्याचे मला सांगितले.

आझाद मैदान वाहतुक विभाग येथील प्रभारी पोलीस निरीक्षक शितल मालटे व वाहतुक पोलीस अंमलदार तुषार चव्हाण (नाना) यांना लाचेची रक्कम देण्याची माझी इच्छा नसल्याने मी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई येथे दिनांक ११/०१/२०२२ रोजी समक्ष हजर राहून लाप्रवि कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे पो.नि. देवकर यांना भेटलो असता त्यांनी प्रभारी पोलीस निरीक्षक शितल मालटे व पोलीस अंमलदार तुषार चव्हाण (नाना) हे लाचेची मागणी करीत असल्याबाबत मला लेखी तक्रार अर्ज लिहून देण्यास सांगितले मी माझा तक्रार अर्ज हिंदी भाषेमध्ये लिहून

समक्ष

( प्रदीप देवकर )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,, मुंबई

श्री.हरीश राम बहाल सिंह, वय ५१ वर्षे यांचा जबाब पुढे चालू......

दिला. पो.नि. देवकर यांनी सदर अर्जावर माझी सही घेतली. त्यानंतर पोनि देवकर यांनी दोन शासकीय पंचांशी व सपोआ जाधव यांचेशी माझी ओळख करून दिली. पो.नि. देवकर यांनी पंचांना थोडक्यात हकिकत सांगून तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पो.नि. देवकर यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पो.नि. देवकर यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज त्यांचे स्वत:चे ताब्यात ठेवला.

त्यानंतर पो.नि देवकर यांनी दिनांक ११/०१/२०२२ रोजी पंचांसमक्ष आझाद मैदान वाहतुक विभाग येथील प्रभारी पोलीस निरीक्षक शितल मालटे व वाहतुक पोलीस अंमलदार तुषार चव्हाण (नाना) यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बाजुस असलेल्या खिशामध्ये डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले.

पो.नि देवकर यांनी माझी पडताळणी पथकाची ओळख करून देवून ला.प्र.वि. कार्यालयातून पोलीस पथकासह निघून किल्ला कोर्टच्या पाठीमागील बाजुस, शासकीय वाहनासह थांबलो. त्यानंतर मला पो.नि. देवकर यांनी आझाद मैदान वाहतुक विभाग येथील प्रभारी पोलीस निरीक्षक शितल मालटे व वाहतुक पोलीस अंमलदार तु ार चव्हाण (नाना) यांचे कार्यालयात पडताळणीकरीता डिजीटल रेकॉर्डर चालू करून शर्टाचे आतील बाजुस असलेल्या खिशामध्ये डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून पंच श्री. पडवळ यांचे सह टॅक्सीने पाठविले असता वाहतुक पोलीस अंमलदार चव्हाण हे मला कार्यालयात दिसले नाही. मी माझे मोबाईल क्र. ९९२०६४५५६४ वरून लोकसेवक चव्हाण यांचे मोबाईल फोन क्र. ९७६९२२०३८६ वर फोन केला असता त्यांनी तो उचलला व ते थोडया वेळात कार्यालयात येत असल्याचे मला सांगितले. सदरचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आलेले आहे. थोडया वेळाने लोकसेवक चव्हाण हे आझाद मैदान वाहतुक विभाग कार्यालयाजवळ आले व मला भेटले माझी त्यांच्यासोबत कामासंदर्भात चर्चा झाली. पोलीस अंमलदार चव्हाण यांनी आज मालटे मॅडम ऑफीसला उपस्थित नसल्याने मला उदया दि. १२/०१/२०२२ रोजी पुन्हा कार्यालयात भेटण्याकरीता बोलाविले.

त्यानंतर पो.नि देवकर यांनी दिनांक १२/०१/२०२२ रोजी पंचांसमक्ष आझाद मैदान वाहतुक विभाग येथील प्रभारी पोलीस निरीक्षक शितल मालटे व वाहतुक पोलीस अंमलदार चव्हाण यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी पुन्हा पडताळणी करण्यात येणार असल्याचे मला सांगितले. पो.नि. देवकर यांनी सांगितल्याप्रमाणे मी दि. १२/०१/२०२२ रोजी लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथील कार्यालायात सकाळी १०.०० वाजता हजर झालो.

त्यानंतर पो.नि देवकर यांनी सदर दिवशी पंचांसमक्ष आझाद मैदान वाहतुक विभाग येथील प्रभारी पोलीस निरीक्षक शितल मालटे व वाहतुक पोलीस अंमलदार चव्हाण यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी पडताळणी करण्यात येणार असुन पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बाजुस असलेल्या खिशामध्ये डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले.

समक्ष

( प्रदीप देवकर )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,, मुंबई

श्री.हरीश राम बहाल सिंह, वय ५१ वर्षे यांचा जबाब पुढे चालू......

पो.नि. देवकर यांनी माझी पडताळणी पथकाची ओळख करून देवून ला.प्र.वि. कार्यालयातून पोलीस पथकासह निघून रेल्वे दावा अधिकरण मुंबई न्यायापीठाचे समोर, मुंबई येथे शासकीय वाहनासह थांबलो. त्यानंतर मला पो.नि. देवकर यांनी आझाद मैदान वाहतुक विभाग येथील प्रभारी पोलीस निरीक्षक शितल मालटे व वाहतुक पोलीस अंमलदार चव्हाण यांचे कार्यालयात पडताळणीकरीता डिजीटल रेकॉर्डर चालू करून माझे शर्टाच्या आतील बाजुस असलेल्या खिशामध्ये डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून पंच श्री. पडवळ यांचे सह टॅक्सीने पाठविले असता लोकसेवक चव्हाण हे कार्यालयात उपस्थित होते. माझेमध्ये व लोकसेवकामध्ये कामसंदर्भात चर्चा झाली. त्यानंतर लोकसेवक चव्हाण हे मला व पंच श्री. पडवळ यांना प्रभारी पोलीस निरीक्षक शितल मालटे मॅडम यांचे केबीनमध्ये घेवुन गेले. त्यावेळी मालटे मॅडम यांनी मला येथुन पुढे त्यांच्या हद्दीमध्ये पार्कींगकरीता दर महिन्याचे दोन गाडयांचे एकुण रू.३,०००/— दयावे लागतील असे सांगितले.

त्यानंतर मी रेल्वे दावा अधिकरण मुंबई न्यायापीठाचे समोर, मुंबई येथे उभ्या असलेल्या पोलीस वाहनाजवळ परत आलो. पो.नि. देवकर यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचासमक्ष ऐकले. आझाद मैदान वाहतुक विभाग येथील प्रभारी पोलीस निरीक्षक शितल मालटे व वाहतुक पोलीस अंमलदार चव्हाण याने पडताळणी दरम्यान लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने व लोकसेवक याने लाचेची रक्कम तात्काळ मागणी केली असल्याने त्वरीत सापळा कारवाई करावयाची आहे असे सांगितले. त्याप्रमाणे मला सापळा कारवाईच्यावेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर माझे कडुन लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. ३,०००/— (रू. ५००/— दराच्या ६ भारतीय चलनी नोटा) स्वतःचे ताब्यात घेतल्या. सदर नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन अँथ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले. पो.नि. देवकर यांनी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मला माझा चेहऱ्यावर लावलेला मास्क डाव्या हाताने खाली करून पुर्वनियोजीत इशारा करावा असे सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले.

त्यानंतर पोलीस वाहनात पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेस अँथ्रासीन पावडर लावली व माझे शर्टाचे आतील बाजुस असलेल्या खिशामध्ये डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून पंच श्री. पडवळ यांचेसह सापळा कारवाईकरीता लोकसेवक यांचे आझाद मैदान वाहतुक विभाग, मुंबई येथे टॅक्सीने पाठविले. माझे पाठोपाठ पंच क्र. ०२ श्री. बनकर व पोलीस पथक काही अंतर ठेवून होते. मी, लोकसेवक यांच्या कार्यालयाजवळ गेलो असता लोकसेवक चव्हाण हे मला कार्यालयात दिसले नाही. मी माझे मोबाईल क्र.९९२०६४५५६४ वरून लोकसेवक चव्हाण यांचे मोबाईल फोन क्र. ९७६९२२०३८६ वर फोन केला असता त्यांनी तो उचलला व ते थोडया वेळात कार्यालयात येत असल्याचे मला सांगितले. सदरचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आलेले आहे. थोडया वेळाने लोकसेवक चव्हाण हे आझाद मैदान वाहतुक विभाग जवळ आले व माझे सोबत कामासंदर्भात चर्चा करीत मला आझाद मैदान वाहतुक विभाग, मुंबई चौकीच्या दरवाजाच्या बाहेरील बाजुस असतानाच त्यांनी माझेकडे लाचेच्या रक्कमेची मागणी केली. लोकसेवक चव्हाण यांनी मागितल्यानंतर माझे कडील अँथ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम रू.

समक्ष

( प्रदीप देवकर )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,, मुंबई

श्री.हरीश राम बहाल सिंह, वय ५१ वर्षे यांचा जबाब पुढे चालू......

३,०००/— (रू. ५०० दराच्या ६ भारतीय चलनी नोटा) त्यांना दिली असता त्यांनी त्यांच्या खाकी रंगाच्या युनिफॉमच्या पॅटच्या उजव्या खिशामध्ये ठेवली. लोकसेवक चव्हाण यांनी लाचेची रक्कम घेतल्यानंतर मी सापळा पथकास दिसेल अशा रीतीने माझा चेहऱ्यावर लावलेला मास्क डाव्या हाताने खाली करून सापळा पथकास पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी पोलीसांनी तात्काळ लोकसेवक चव्हाण यांस रू. ३,०००/— लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले. त्यानंतर पो.नि. देवकर व स.पो.आ. जाधव यांनी आझाद मैदान वाहतुक विभाग, मुंबई चौकीच्या समोरील बाजुस असलेल्या कॅबीनमधुन प्रभारी पोलीस निरीक्षक शितल मालटे मॅडम यास ताब्यात घेतले व त्यांच्या कॅबीनची पंचासमक्ष झडती घेतली असता त्यांच्या केबीनमध्ये एकुण रू. ४,८१,५०० ची रोख रक्कम १० वेगवेगळया लिफाफ्यात मिळाली असल्याचे मी पाहिले.

त्यानंतर मी, दोन पंच, सापळा पथकातील अधिकारी कर्मचारी व लोकसेवक पोलीस निरीक्षक शितल मालटे मॅडम व पोलीस अंमलदार चव्हाण असे आम्ही सर्व दोन शासकीय वाहनाने लाप्रवि कार्यालय, वरळी येथे आलो. सदर बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

तरी, आझाद मैदान वाहतुक विभाग येथील प्रभारी पोलीस निरीक्षक शितल मालटे मॅडम व वाहतुक पोलीस अंमलदार पो.शि.क्र. ०९.३१८७/ तुषार किसन चव्हाण (नाना) यांनी मला कुलाबा, कफपरेड, व्हि.टी पर्यत माझे दोन बसेसला हद्दीमध्ये पार्कींगकरीता कोणतीही अडचण येणार नाही तसेच कुलाबा वाहतुक विभागाच्या मुबारक शेख मॅडम देखील माझे दोन्ही बसेसवर कारवाई करणार नसल्याचे सांगुन माझेकडुन दोन गाडयांचे दरमहा एकुण रू. ३,०००/— रक्कमेची मागणी केली. दिनांक १२/०१/२०२२ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी मध्ये प्रभारी पोलीस निरीक्षक शितल मालटे मॅडम व वाहतुक पोलीस अंमलदार तुषार किसन चव्हाण (नाना) यांनी लाचेच्या रक्कमेची मागणी करून नमुद लाचेची रक्कम रू. ३,०००/— स्विकारली म्हणुन माझी प्रभारी पोलीस निरीक्षक शितल मालटे मॅडम व वाहतुक पोलीस अंमलदार तुषार किसन चव्हाण (नाना) यांचेविरूध्द कायदेशिर तक्रार आहे.

आझाद मैदान वाहतुक विभाग येथील प्रभारी पोलीस निरीक्षक शितल मालटे व वाहतुक पोलीस अंमलदार नाना चव्हाण यांचेशी माझे कोणतेही पूर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देण्याघेण्याचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून ती मला मराठीतुन वाचून हिंदीतून समजावुन सांगितली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( प्रदिप देवकर )
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ............ तात्काळ

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य (1) लाचेची रक्कम 3000/-

Total Value of properties stolen / involved (2) आलोसे क्र. 1 यांच्या कार्यालयीन झडतीत

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) मिळालेली रोख रक्कम 4,81,500/- रु

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद तारीख वेळी व ठिकाणी यातील कॉलम क्र.07 मधील आलोसे क्र 01 यांनी यातील फिर्यादी यांच्या मालकीच्या दोन बसेसवर नो पार्किंग करीता दंडात्मक कारवाई न करण्यासाठी प्रत्येक बससाठी दरमहा रु 1500/- प्रमाणे लाचेची मागणी केली व आलोसे क्र 1 यांच्या सांगण्यावरून दोन बसेस करीता एकूण रु 3000/- इतकी लाचेची रक्कम स्विकारताना आलोसे क्र 2 याना रंगेहात पकडण्यात आले म्हणून कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अन्वये गुन्हा नोंद

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पो.नि. प्रदीप देवकर

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ............, जिल्हा ............, राज्य ............

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)............ Rank............ No............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to............ (3) Transferred to P. S. ............ District............ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name प्रदीप देवकर

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड क्र. लाच प्रतिबंध विभाग, मुंबई

Posting

Code No. of I. O. ............

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख............

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**